बृहन्मुंबई
महानगरपालिका

**विधि खाते**

जाहिरात क्र : एलओ/ एलईए/०२१६७० दिनांक : १८.०७.२०२३

**जाहिरात**

**सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या पदाची सरळसेवा भरती**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विधि खात्याच्या आस्थापनेवरील सहायक कायदा अधिकारी व सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन (ONLINE) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पदावरील नियुक्ती ही महानगरपालिकेने बार कौन्सिल ऑफ इंडिया यांच्याविरुद्ध मान. सर्वोच्च न्यायालयात ''महानगरपालिकेच्या वकिलांना न्यायालयामध्ये महानगरपालिकेतर्फे न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी परवानगी देण्याबाबत'' दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.८६९४/२०१३ च्या अंतिम निर्णयासापेक्ष तात्पुरत्या स्वरुपात राहील. जर मा. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश महानगरपालिकेच्या विरुद्ध लागल्यास तो निवड झालेल्या उमेदवारांवर बंधनकारक राहील व त्यांची सेवा कोणतेही कारण न देता समाप्त करण्यात येईल.

**रिक्त पदे भरावयाचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | भरावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | सहायक कायदा अधिकारी | (M२६: ४७६००-१५११००) अधिक नेहमीचे भत्ते | ३४ |
| २. | सहायक कायदा अधिकारी (श्रेणी-२) | (M२२: ३८६००- १२२८००) अधिक नेहमीचे भत्ते | १९ |

- वरील पदांसाठीची सविस्तर जाहिरात, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांची संख्या, विहित अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, शैक्षणिक अर्हता, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया व इतर महत्त्वाच्या सर्व सूचना इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn** या संकेतस्थळावर दि. २५.०७.२०२३ पासून उपलब्ध होईल.

**सर्वसाधारण सूचना:**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn** या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्तीसह प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसरून जाहिरातीत नमूद अटी व शर्तीनुसार आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने अपलोड करावेत. ऑनलाईन प्रक्रियेशिवाय केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्ज भरावयाची माहिती **https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn** या संकेतस्थळावर होईल.

(1) उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.

(2) ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी दि. २५.०७.२०२३ पासून दि. २४.०८.२०२३ पर्यंत रात्री ११.५० वाजेपर्यंत राहील.

(3) वर दिलेल्या विहित वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल.

(4) भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांनी सदरचे यादीत स्वतःचे नाव तपासून ऑनलाईन परीक्षेकरिता उपस्थित रहावे. त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

(5) ऑनलाईन परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून सामाजिक / समांतर आरक्षणानुसार आवश्यक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवडयादी तयार करण्यात येईल व **https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlrn** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

उमेदवाराने अर्ज सादर करणेपूर्वी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. फक्त ऑनलाईनद्वारे अर्ज स्वीकारण्यात येणार असल्यामुळे महापालिकेने छापील अर्ज उपलब्ध करुन दिलेले नाहीत यादी नोंद घ्यावी.

**सही/-**
**कायदा अधिकारी,**
**विधि खाते**

**पीआरओ/१०८६/जाहिरात/२०२३-२४**

**खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.**